ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १४७ वा | दिनांक : ०५/०३/२०२५ | वार : बुधवार

## शिवसेना ठाकरे गटाकडून विरोधीपक्ष नेते पदावर दावा:भास्कर जाधव यांच्या नावावर शिक्कामोर्तब



**मुंबई** : विधानसभा विरोधी पक्षनेतेपदासाठी शिवसेना ठाकरे गटाने दावा केला असून भास्कर जाधव यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याची माहिती समोर येत आहे. त्यानुसार भास्कर जाधव हे विधानसभेचे विरोधी पक्षनेते असणार आहेत. त्यानुसार अशा आशयाचे पत्र विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना देण्यात आले आहे. तसेच कॉंग्रेसने देखील विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेतेपद आपल्याला मिळावे अशी मागणी केली असल्याची माहिती समोर आली आहे.

महाविकास आघाडीमधील तिन्ही पक्षात विरोधी पक्षनेते पदासाठी आवश्यक असलेले संख्याबळ नाही. त्यामुळे आतापर्यंत विधानसभा विरोधी पक्षनेते पदाचा निर्णय झाला नव्हता. मात्र, आता शिवसेना ठाकरे गटाकडून विरोधी पक्षनेते पदावर दावा करण्यात आला आहे. त्यावर आता अंतिम निर्णय विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर घेणार आहेत.

यावर शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. विधानभवन प्रांगणात उद्धव ठाकरे यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, आम्ही विरोधी पक्षनेते पदावर दावा केला आहे. साहजिकच आहे कॉंग्रेस असो किंवा राष्ट्रवादी असो महाविकास आघाडी म्हणून पुढची वाटचाल जी आहे ती आम्ही एकत्र करणार आहोत.

पुढे उद्धव ठाकरे म्हणाले, आज आम्ही विधानसभा अध्यक्षांकडे विधानसभेच्या विरोधी पक्षनेते पदासाठी भास्कर जाधव यांच्या नावाची मागणी केली आहे. आणि आम्हाला खात्री आहे की लोकशाही मूल्यांचे पालन करून लवकरात लवकर याचा निर्णय होईल आणि बजेटपूर्वी कारण बजेटमध्ये विरोधीपक्ष नेता असायला पाहिजे ज्यामुळे जनतेच्या बाजूने बोलू शकेल. त्यामुळे आम्ही अपेक्षा अशी करत आहोत की मुख्यमंत्री ज्या प्रमाणे स्वच्छ कारभार करत आहेत, भ्रष्टाचार विरोधात असेल परवाच त्यांनी सांगितले की कोणीही गुंड असला, कोणत्याही पक्षाचा असला तरी त्याला कोणतीही दया माया दाखवली जाणार नाही. त्याच पद्धतीने त्याच हिंमतील जागून याही प्रकरणावर लवकरात लवकर निर्णय होईल अशी आम्हाला अपेक्षा आहे.

विरोधी पक्षनेते पदासाठी अडीच वर्षांचा फॉर्म्युला आहे का, असा प्रश्न विचारला असता त्यावर उद्धव ठाकरे म्हणाले, असे काही नाही. म्हणून मी म्हणालो आहे की आम्ही एकत्रित पुढे जाणार आहोत. पुढे बऱ्याच गोष्टी आहेत निवडणुका आहेत तेव्हा पुढे बघूया. पुढे बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, भाजपला आदित्य ठाकरेंचे नाव चालले असते हे मला आधी माहीत असते तर बरे झाले असते. म्हणजे घराणेशाहीला त्यांचा विरोध नाही हे आधी माहीत असते तर बरे झाले असते.

## क्रूर गुन्हेगारांचा आश्रयदाता धनंजय मुंढेंच - संभाजीराजे छत्रपतींचा हल्लाबोल



**मुंबई** : सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचे फोटो व व्हिडिओ समोर आल्यानंतर संतापाची लाट उसळली व धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याच्या मागणीने जोर धरला होता. महाराष्ट्रातील जनतेच्या आक्रोशापुढे झुकत तब्येतीचे कारण पुढे करत आज धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिला आहे. यावर संभाजीराजे छत्रपती यांनी संतप्त प्रतिक्रिया देत धनंजय मुंडे यांच्यावर जोरदार टीका केली आहे.

स्वराज्य संघटनेचे प्रमुख संभाजीराजे छत्रपती यांनी आक्रमक शब्दांत भावना व्यक्त केल्या आहेत. संतोष देशमुख यांच्या हत्येचे फोटो बाहेर पडले, यामुळे केवळ या प्रकरणातील आरोपींचेच नाही तर या आरोपींना पोसणाऱ्या, पाठीशी घालणाऱ्या अनेकांचे चेहरे व या चेहऱ्यांमागची विकृती उघडी पडली आहे. या क्रूर गुन्हेगारांचा आश्रयदाता धनंजय मुंडेच असल्याचे जाहीरपणे सांगून निःपक्षपातीपणे या प्रकरणाचा तपास व्हावा, यासाठी धनंजय मुंडेला मंत्रिपदच देऊ नये, अशी मागणी आम्ही अडीच महिन्यांपूर्वी केली होती, असे संभाजीराजे छत्रपती म्हणाले आहेत.

पुढे बोलताना संभाजीराजे छत्रपती म्हणाले, लोकभावना बासनात गुंडाळून मुंडेला मंत्रिपद दिले गेले. राजीनाम्याच्या मागणीकडेही अडीच महिने दुर्लक्ष केले गेले. किंचितही नैतिकता असती तर अडीच महिन्यांपूर्वीच हा राजीनामा दिला गेला असता. मंत्रिपदाचे कवच घालून आरोपपत्र दाखल होण्याची वाट पाहत होता का? आजचा राजीनामा ही एकप्रकारची कबुलीच आहे, असे म्हणत संभाजीराजे छत्रपती यांनी हल्लाबोल केला आहे.

दरम्यान, धनंजय मुंडे यांनी राजीनामा देताना तब्येतीचे कारण पुढे केले आहे. याबाबत त्यांनी ट्विट करत माहिती दिली आहे. धनंजय मुंडे म्हणाले, बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे स्व. संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येतील आरोपींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी, ही माझी पहिल्या दिवसापासूनची ठाम मागणी आहे. काल समोर आलेले फोटो पाहून तर मन अत्यंत व्यथित झाले. या प्रकरणाचा तपास पूर्ण झाला असून आरोपपत्र न्यायालयात दाखल झाले आहेत. तसेच, न्यायालयीन चौकशीही प्रस्तावित आहे. माझ्या सदसद्विवेक बुद्धीला स्मरून आणि मागील काही दिवसांपासून माझी प्रकृती ठीक नसल्याने पुढील काही दिवस उपचार घेण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे, त्यामुळे वैद्यकीय कारणास्तव सुद्धा मी मंत्रिमंडळातून माझ्या मंत्रिपदाचा राजीनामा मुख्यमंत्री महोदयांकडे दिला आहे.

धनंजय मुंडे यांनी राजीनाम्याचे कारण वैद्यकीय सांगितले आहे. मात्र, राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नैतिकतेतून राजीनामा दिल्याची प्रतिक्रिया दिली होती. धनंजय मुंडे यांनी दिलेले कारण व अजित पवारांनी दिलेली प्रतिक्रिया यात विसंगती दिसून आल्याने देखील संताप व्यक्त केला जात आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०५ मार्च २०२५


## अंगणवाडी पदांसाठी कन्नड मध्ये शेकडो अर्ज दाखल



**कन्नड (अरुण थोरात) :** कन्नड तालुक्यातील अंगणवाडी सेविका, मदतनीस पदांसाठी शेकडो अर्ज दाखल झाल्याने, ईच्छुकांत चुरस निर्माण झाली आहे.एकात्मिक बाल विकास सेवा योजना कन्नड अंतर्गत एकुण सहा अंगणवाडी सेविका व ७४ अंगणवाडी मदतनीस अशा एकूण ८२ पदांसाठी जाहिर प्रगटनाद्वारे ईच्छुकां कडून अर्ज मागविण्यात आले होते. दि. ०४ मार्च हाअर्ज स्विकारण्याचा शेवटचा दिवस होता. शेवट च्या दिवशी अंगणवाडी सेविका पदा साठी ११४ तर मदतनीस पदा करिता ६४९, असे एकुण ७६३ अर्ज प्राप्त झाले आहेत. दि. ०५ मार्च पासून अर्ज छाणणी प्रक्रिया सुरु होणार असून त्यानंतर अंतीम यादी प्रसिद्ध होणार आहे. रिक्त जागा असलेल्या गावांत गाव पातळीवर अंगणवाडी सेविका, मदतनीस पदांसाठी चुरस निर्माण झाली आहे. इच्छुक अर्जदारांचे विविध निकषावर गुणांकन होणार असल्याने निवड प्रक्रिया पारदर्शी पणे पार पडण्याची अपेक्षा इच्छुकांनी व्यक्त केली आहे.

## अश्लेष मोरे यांच्या वाढदिवसानिमित्त कबड्डीचा थरार




**उमरगा (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** भारत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष तथा राष्ट्रीय युवक काँग्रेस धाराशिव जिल्हाध्यक्ष अश्लेष शिवाजीराव मोरे यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यस्तरीय कबड्डी कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन धाराशिव जिल्ह्याचे माजी खासदार प्राध्यापक रवींद्र गायकवाड यांच्या शुभहस्ते आणि भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमोल शिवाजीराव मोरे यांच्या उपस्थित झाला.उमरगा येथील कै शिवाजीराव दाजी मोरे क्रीडा संकुलामध्ये ३ मार्च ते ६ मार्च दरम्यान राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले ग्रामीण भागातील युवकांनी कबड्डी आपल्या पारंपरिक खेळाचा विस्तार करावा असे आव्हान उद्घाटनपर भाषणात प्रा गायकवाड यांनी केले यावेळी पोलीस निरीक्षक अश्विनी भोसले भारत शिक्षण संस्थेचे सचिव पद्माकरराव काका हराळकर, सहसचिव डॉक्टर सुभाष वाघमोडे, संचालक भानुदास माने, रामराव इंगोले, दिगंबरराव बिराजदार, अशोक पाटील, राजेंद्र माने, रमेश बिराजदार, शिवसेना पक्ष निरीक्षक युवा नेते किरण गायकवाड, सचिन जाधव, नितीन होळे आदींची प्रमुख उपस्थिती होती.उद्घाटनपर प्रदर्शनी सामन्यातग्रामीण गटातला पहिला सामना पारस खेड विरुद्ध बलसुर यांच्यामध्ये झाला. या सामन्यात बलसुर संघाने १३ गुणांनी विजयी संपादन केले या सामन्यात सरपंच म्हणून मुनीर शेख पंच म्हणून गोविंद जाधव व पंच म्हणून मालोजी काळे सहाय्यक गुणलेखक म्हणून सुरेंद्र वाले संतोष राठोड गुणलेखक म्हणून आनंदराज बिराजदार थर्ड रेड राजेंद्र सगर सर इत्यादींनी काम पाहिलेतर दुसरा प्रदर्शनी सामना श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा विरुद्ध डाळिंब या संघादरम्यान सामना झाला. या सामन्यात शिवाजी महाविद्यालयाचा संघ २१ गुणांनी विजयी झाला. सदर सामन्यात सरपंच म्हणून मालाजी काळे पंच म्हणून मुनीर शेख गोविंद जाधव गुणलेखक म्हणून आनंदराज बिराजदार सहाय्यक गुणलेखक म्हणून सुरेंद्र वाले संतोष राठोड थर्ड रेड साठी राजेंद्र सगर यांनी काम पाहिले.या राज्यस्तरीय स्पर्धेचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉक्टर संजय अस्वले यांनी केले. राज्यभरातून एकूण ४२ संघ या स्पर्धेसाठी कबड्डीचे सादरीकरण करणार आहे.या कार्यक्रमासाठी अश्लेष भैया मोरे मित्र मंडळाचे अध्यक्ष विशाल कानेकर, अशोक ममाळे ,नितीन कोराळे, अरविंद पाटील, संतोष चौधरी, जयवंत मोरे, नितीन राठोड, व्यंकट पवार,अमोल बंडे, अमित रेड्डी, अर्जुन बिराजदार आदींनी पुढाकार घेतला आहे.यासाठी तालुक्यातील क्रिडा शिक्षक प्रा. विजय पवार, डॉ. राजु सूर्यवंशी, प्रा जी बी गायकवाड, राजेंद्र सोलंकर, संजय कोथळीकर, मुनीर शेख, गोविंद जाधव, सुरेंद्र वाले, राजेंद्र सगर, विश्वजीत दुबे, आनंदराज बिराजदार, संतोष राठोड, राजेंद्र पाटील, बाबुराव पवार, विश्वजीत दुबे, विक्रांत मोरे, हिरालाल गायकवाड, नारायण सोलनकर, ज्ञानेश्वर बिराजदार, अनिल मदनसुरे, डॉ ए सी पाटील, कबड्डीचे व्यवस्थापन पाहत आहेत.

## धनंजय मुंढेंचा राजीनामा हे केवळ नाटक - प्रणिती शिंदे



**सोलापूर :** बीड येथील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचे फोटो व व्हिडिओ समोर आले व त्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली व आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी मागणी केली जात आहे. याच सोबत मुख्य आरोपी वाल्मीक कराडचा धनंजय मुंडे यांच्याशी जवळचा संबंध असल्याने धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार आज धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिला आहे. या राजीनाम्यावर कॉंग्रेस खासदार प्रणिती शिंदे यांनी टीका केली आहे.

प्रणिती शिंदे म्हणाल्या, अतिशय क्रूरपद्धतीने हत्या करण्यात आली आहे. मी त्यांच्या मुलीचे व पत्नीचे ऐकले तसेच त्यांच्या भावाचे ऐकले आणि खरे तर त्याच वेळी तो राजीनामा झाला पाहिजे होता. पण अतिशय निगरगट्ट असे हे सरकार आहे. आणि जे आपण बघत आहोत व्हिडिओ काढून कोणीतरी दाखवला जात आहे ते नेमके कोण होते ज्यांना दाखवला गेला तो व्हिडिओ आणि कोणाच्या ऑर्डरनी करण्यात आले? मला असे वाटते की राजीनामा जरी दिला असला तर तो राजीनामा एक प्रकारचे नाटक आहे. आता ते म्हणत आहेत की वैद्यकीय कारण म्हणजे ते स्वीकारत पण नाहीत. म्हणजे बघा इतके हे हास्यास्पद असेल ही गोष्ट म्हणजे ते म्हणतात की वैद्यकीय कारणांमुळे राजीनामा दिला.

पुढे बोलताना प्रणिती शिंदे म्हणाल्या, थोडे जरी वाटत असते की मी याची जबाबदारी घेतो कारण हे जग जाहीर आहे की कोणी हे करायला लावले आणि कोणाच्या ऑर्डर होत्या, तो कोणाचा माणूस होता आणि एवढेच नाही पण यांचे नाव आरोपी म्हणून पण आले पाहिजे अशी आमची मागणी आहे. याच्यावर कारवाई झाली पाहिजे. खासकरून या मंत्र्यांवर कारवाई झाली पाहिजे की नेमके हे कशामुळे झाले आणि कसे झाले याच्या खोलपर्यंत गेले पाहिजे. यांना कोणीही पाठीशी घालण्याची गरज नाही हे आपल्याला दिसून येते. त्यामुळे आरोपी म्हणून धनंजय मुंडे यांचे नाव आलेच पाहिजे अशी आमची मागणी आहे.

नैतिक जबाबदारी घेऊन तो राजीनामा झाला पाहिजे होता आणि आरोपी म्हणून त्यांचे नाव येणे गरजेचे आहे. आमदारकी पण म्हणजे लोकांसमोर येण्याचा देखील आता यांचा चेहरा राहिलेला नाहीये. राजीनामा देऊन परत ६ महिन्यानंतर मंत्रिपद मिळण्याची शक्यता आहे. कारण हे सरकार दाखवण्यापूर्तेच नाटक करेल आणि त्यानंतर पुन्हा एकदा काही निष्पन्न नाही झाले म्हणून स्टेटमेंट येईल म्हणून त्यांना आरोपी म्हणून नेमले गेले पाहिजे, अशी मागणी प्रणिती शिंदे यांनी केली आहे.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक

या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०५ मार्च २०२५


## औरंगजेबानेही केले नसेल असे कृत्य करून ठेवले - बच्चू कडू



**अमरावती :** बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचे फोटो व व्हिडिओ समोर आल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्र हादरले आहे. आरोपींनी अत्यंत क्रूर व अमानुषपणे संतोष देशमुख यांची हत्या केली होती. संतोष देशमुख यांना मारहाण करताना व्हिडिओ देखील या नराधमांनी बनवले होते. या संपूर्ण घटनेवर संपूर्ण राज्यातून संतापाची लाट निर्माण झाली आहे. यावर प्रहार संघटनेचे नेते व माजी आमदार बच्चू कडू यांनी संतप्त प्रतिक्रिया देत थेट औरंगजेबाशी तुलना केली आहे.

संतोष देशमुख प्रकरणावर प्रतिक्रिया देताना बच्चू कडू म्हणाले, मला असे वाटते की एकंदरीत एवढी निर्घृण हत्या झाली आणि एवढे सगळे होऊन राजकारणी लोकांनी त्यावर राजकारण केले आहे. खरे तर हा दोन जातीतला वाद नसून ही प्रवृत्ती आहे. ज्या प्रमाणे संतोष देशमुखची हत्या झाली ती कशा प्रकारे झाली? ते कुठल्या प्रवृत्तीचे लोक होते? त्यांची जात कोणती होती? हा विषय महत्त्वाचा नाही. त्यांची जी प्रवृत्ती होती ती फार मला असे वाटते एखाद्या दुश्मनाच्याही म्हणजे औरंगजेबानेही केले नसेल असे कृत्य करून ठेवले आहे.

पुढे बोलताना बच्चू कडू म्हणाले, अशा प्रवृत्तीला ठेचण्यासाठी तुम्हाला इतकी वर्ष लागतात. ती प्रवृत्ती वाढली कशी? कोणी खतपाणी घातले? ही जबाबदारी तिथल्या पोलिस प्रशासनाची नाही का? हे सगळे कसे आहे डोंगर मोठा झाल्यानंतर आता तुम्ही उंदराची चाल चलत आहात. वास्तविक याच्यामध्ये हे सगळे हत्या झाली म्हणून उघडकीस आले. मग एकंदरीत चालू काय होते बीडमध्ये? कोणाच्या आशिर्वादाने चालू होते? राजकारण म्हणजे सगळेच काही असे समजणारे जे लोक आहेत आणि राजकारणासाठी काही पण, कुठे पण आणि कसे पण करण्याची जी प्रवृत्ती आहे या देशामधील लोकांमध्ये वाढली आहे त्याचे हे मोठे उदाहरण आहे.

दरम्यान, संतोष देशमुख यांच्या हत्येचे फोटो समोर आल्यानंतर धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याच्या मागणीने जोर धरला होता. त्यानुसार धनंजय मुंडे यांनी आज त्यांचा राजीनामा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केला आहे. मात्र आता आमदारकीचा देखील राजीनामा दिला पाहिजे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केली आहे. त्यांची आमदारकी रद्द होईपर्यंत आपला लढा सुरू राहील, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. सोबतच धनंजय मुंडे हे वैद्यकीय कारणाने राजीनामा दिल्याचे म्हणतात. मात्र, त्यांना मन तरी आहे का, असा सवालही त्यांनी केला आहे.

## कृष्णा आंधळे जिवंत नाही, त्याची हत्या झाली - जितेंद्र आव्हाडांचा मोठा दावा



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी संतोष देशमुख हत्या प्रकरणातील फरार आरोपीबाबत मोठा दावा केला आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येला जवळपास तीन महिने होत आले आहेत. मात्र, या प्रकरणातील कृष्णा आंधळे नावाचा आरोपी अद्यापही पोलिसांना सापडलेला नाही. कृष्णा आंधळे जिवंत नाही, त्याची हत्या झाली, असे मोठे विधान जितेंद्र आव्हाड यांनी केले आहे. त्यांनी संतोष देशमुख यांच्या व्हायरल फोटोंवर भाष्य करताना संताप व्यक्त केला. ते फोटो बघून संतोष देशमुख यांच्या मुलांना काय वाटेल? असेही ते माध्यमांशी बोलताना म्हणाले.

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर राज्यभरात संतापाची लाट उसळली आहे. राज्यातील विविध ठिकाणी आंदोलने करण्यात आली. यावेळी दोषींना फाशीची शिक्षा देण्याची मागणी आंदोलकांनी केली. या फोटोंवर जितेंद्र आव्हाड यांनीही संतप्त प्रतिक्रिया दिली.

जितेंद्र आव्हाड म्हणाले, तुम्ही माझी आधीची भाषण काढून बघा. त्या भाषणांमध्ये या सर्व फोटोंचा वर्णन माझ्या भाषणामध्ये आहे. संतोष देशमुख जेव्हा अंतिम घटका मोजत होते, तेव्हा मारणारे नालायक, नराधम, जल्लाद त्यांच्यावरती लघुशंका करत होते. तेव्हा लोकांनी आमच्या टिंगल टवाळी केली. माणसाच्या अंगात इतका क्रूरपणा इथे कुठून आला, आपल्याला सुद्धा एक बहीण आहे, बाप आहे, भाऊ आहे, मुले आहेत, आपण सर्व संसाराच्या लपेटात असताना आपल्या प्रेमाचा झरा आहे कुठे? हृदय कुठे आहे? असा सवालही आव्हाड यांनी केला.

हे सर्व दृश्य बघताना राज्यातील जनता देखील आश्चर्यचकित झाली असेल, गुन्हे केल्यानंतर राजाश्रय मिळतो. आपल्याला काहीच होणार नाही अशी भीती जेव्हा संपते. तेव्हा असे सगळे सुरू होते, जेव्हा आपल्याला भीती असते, मला याच्याबद्दल कोणीतरी प्रश्न विचारेल, त्याबद्दलची भीती असते, पण जेव्हा मला केलेल्या कामाबद्दल शाब्बासकी मिळणार आहे असे ध्यानीमनी स्वप्न असते तेव्हा नराधम असे क्रूर प्रकार करतात, असे आमदार जितेंद्र आव्हाड म्हणाले.

जेव्हा संतोष देशमुख यांचे हे फोटो त्यांची मुले बघतील, तेव्हा त्यांना काय वाटेल. माझ्या वडिलांना असे मारले, काय वाटेल त्यांना. एखादा अपघात बघितल्यानंतर आपल्या डोळ्यासमोरून तो जात नाही. मग हा फोटो डोळ्यासमोरून जाईल असे कसे वाटेल, असे जितेंद्र आव्हाड म्हणाले. या फोटोची जी छवी त्या मुलांच्या मनावर राहिल, तेच त्यांना आयुष्यभर घेऊन जगावे लागेल. याचा मानसिक त्रास त्या मुलांना किती होईल याचा विचार कधी केला आहे का? असा सवाल जितेंद्र आव्हाड यांनी केले.

पुढे बोलताना जितेंद्र आव्हाड यांनी महादेव मुंडे, किशोर फड, बापू अंधारे यांच्या कुटुंबियांना न्याय द्यावा, अशी मागणीही केली. तर कृष्णा आंधळे जिवंत नाही, त्याची हत्या झाली आहे, असे मोठे वक्तव्य त्यांनी केले आहे.

धनंजय मुंडे यांनी वैद्यकीय कारणाने राजीनामा देत असल्याचे सांगितले होते. यावर जितेंद्र आव्हाडांची लेक नताशा यांनी धनंजय मुंडेंच्या ट्विटला रिट्विट करत आपले मत मांडले. ट्विटच्या पहिल्या भागाचा ट्विटच्या दुसऱ्या भागाशी काहीही संबंध नाही. त्यांनी राजीनामा का दिला याचे खरे कारण सांगण्याची विनम्रताही त्यांच्यात नाही. दरम्यान, अजित पवारांचा दावा आहे की त्यांनी नैतिकतेच्या आधारावर राजीनामा दिला आहे. या सरकारने खरोखरच महाराष्ट्रातील जनतेला वेठीस धरले आहे.

हा राजीनामा खूप आधीच व्हायला हवा होता पण सरकार हा मुद्दा शांत होण्याची वाट पाहत होते. सुदैवाने, लोक मागे हटले नाहीत आणि मुख्यमंत्र्यांकडे या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश देण्याशिवाय पर्याय राहिला नाही. मुळात, ज्या माणसाचे जवळचे सहकारी एका क्रूर हत्येत सहभागी होते, त्याला त्यांनी मंत्री म्हणून काम करू दिले. हा महाराष्ट्राचा किती मोठा अपमान आहे, अशा शब्दांत नताशा यांनी सुनावले.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०५ मार्च २०२५

# ग्रामीण कवितेत प्रथमच विद्रोहाचा 'बिगूल' वाजवणारा कवी - ललित अधाने

**समकाळातील अत्यंत संवेदनशील कवी आणि ललित साहित्याचे अभ्यासक डॉ. ज्ञानेश्वर खिल्लारी यांनी 'माही गोधडी छप्पन भोकी' या डॉ. ललित अधाने यांच्या कविता संग्रहावर केलेले भाष्य....**

कवी ललित अधाने यांना ' कुणबी बाप' ग्रामीण कवितासंग्रहाने महाराष्ट्रात ग्रामीण कवी म्हणून नावलौकिक मिळवून दिला. 'कुणबी बाप' या कविता संग्रहानंतर जवळजवळ दोन दशकानंतर 'माही गोधडी छप्पन भोकी' हा कवितासंग्रह प्रकाशित झाला आहे. या संग्रहातील प्रत्येक कवितेचा सर्वप्रथम मी श्रोता आहे. या कवितासंग्रहाला अल्पावधीतच अनेक प्रतिष्ठा प्राप्त पुरस्कार मिळाले. या कवितासंग्रहाची पहिली आवृत्ती अवघ्या एक महिन्यात संपली. दुसरी आवृत्ती येत आहे. या कवितासंग्रहाला डॉ. कैलास अंभूरे यांची विस्तृत व वस्तुनिष्ठ अशी प्रस्तावना लाभलेली असून मुखपृष्ठावरील व कवितासंग्रहाच्या आतील भागात सरदार जाधव यांचे आशय पूर्ण रेखाटने आहेत. 'माही गोधडी छप्पन भोकी' या शीर्षकानुसारच या कवितासंग्रहात एकूण 'छप्पन्न' कवितांचा समावेश करण्यात आलेला आहे. कविता चार विभागात विभागल्या असून सर्वच विभागाला वेगवेगळी शीर्षके देण्यात आलेली आहेत. 'बिगूल' या भागात दहा कविता आहेत तर 'झ्याट मारी झिंगा' या भागात अकरा कविता आहेत. 'एन- ए लेआउट' या भागात चोवीस कविता असून 'दु:खाच्या ऐरणीवर' या चौथ्या भागात अकरा कवितांचा समावेश करण्यात.'माही गोधडी छप्पन भोकी' या संग्रहातील अर्पणपत्रिकेत ललित अधाने म्हणतात त्याप्रमाणे "शेतकरी आंदोलनात बळी पडलेल्या तमाम शेतकरी बांधवांना..."संग्रहातील सर्वच कविता या शेतकरी व त्यांच्यावर आजवर झालेल्या अन्यायाचं फक्त वर्णन करत नाहीत तर त्या विरोधात प्रखर विद्रोह नोंदवितात. जागतिकीकरण, खाजगीकरण, बाजारीकरण, यांत्रिकीकरण, शासन व्यवस्थेचा सत्तापीपासूनपणा व प्रशासनाचा सावळा ( सगळेच ऑनलाईन भ्रष्टता) गोंधळ, ऑनलाईनच्या माध्यमातून शेतकऱ्याची पिळवणूक यामुळे सगळंच अत्याधुनिक झाले असले तरी आमचा शेतकरी आजही आधुनिक झालेला दिसत नाही. याचे वास्तव चित्रण कवी ललित अधाने यांच्या कवितासंग्रहातून मुखर झाले आहे. सर्वच कविता प्रस्थापित समाज व्यवस्थेवर विद्रोहाच्या माध्यमातून प्रखर प्रहार करताना दिसतात. इंडिया आणि भारत यातला फरक मिटवण्यासाठी नव्यानेच रणशिंग फुंकण्याची भाषा कवी येथे करताना दिसतो. आता कोणाचाही अत्याचार सहन करायचा नाही आणि कुणाच्याही दबावाला बळी पडायचं नाही म्हणून कवी म्हणतो-"आता आऱ्या खायच्या न्हाईलगाम हाती द्यायचा न्हाईझ्याट मारी झिंगा** पिंगा"कवितेची भाषाही विद्रोही व्यवस्थेविरुद्ध आसूड ओडताना दिसते. आता शेतकरी आंदोलनातून शेतकरी कष्टकरी शासन व्यवस्थेवर तुटून पडलेली आहे आता कितीही रक्ताचे पाठ वाहिले तरी माघार नाही "फडकला लाल रक्तीम निशान बांध पेटले राना रानातून धारदार भाल्याची टोकं निघालीत पानापानातून"वर्षानुवर्ष इथला शेतकरी आपल्याकडे आईवर जीवापाड प्रेम करत आलाय. शेती हाच त्याचा उदरनिर्वाहाचा कायमस्वरूपी आधार राहिलेला आहे. याच शेतीला इथल्या बिल्डर लॉबीने शासनाच्या नाकारतापणामुळे विकासाच्या नावाने लुबाडून घेतलेले आहे. शेतकऱ्याला शेती करण्यासाठी शास्वत स्वरूपाचे पाणी उपलब्ध नाही, शेतमालाला भाव नाही, कर्जमाफीचे गाजर दाखवून शेती परवडणारी नाही हेच सिद्ध करण्याचा प्रयत्न केला जातो. "एक जण म्हणाला शेतात राम राहिला नाही मग वर्षानुवर्ष बाप रानात काय हुडकतोय?"या चार ओळीतल्याच कवितेतून अधाने यांनी सद्य स्थितीत शेतीची,शेतकऱ्याची अवस्था टिपलेली आहे. पिढ्यानपिढ्या इथला शेतकरी रोज शेतात रक्ताचे पाणी करतोय शिवाय कोणत्याही नफा, तोट्याचा विचार न करता आपल्या शेतीमातीला जपत आलाय. त्याच्या डोक्यात कधीच शेती विकण्याचा विचार येत नाही. पण ही व्यवस्था त्याला चोहोबाजूने घेरत आहे. शिल्लक काहीच उरत नसेल तर मग त्याला हा वेगळा विचार करायला येथील व्यवस्था भाग पाडत आहे... "आमच्या हजारो पिढ्या अशाच गेल्या मातीत आता मीही करतो विचार करून टाकावा एकदाचा एन - ए - ले आऊट शिल्लक उरतच नसेल तर"या देशात लोकशाही आहे म्हणूनच येथील सगळ्याच व्यवस्थेवर शेतकरी विश्वास ठेवून आहे. असे असले तरी अजूनही लोकशाहीचा कोणताच स्तंभ शेतकऱ्याची बाजू घेताना दिसत नाही ही वस्तुस्थिती आहे. कांदा, तूर, कापूस, गहू, ऊस इत्यादी नगदी पिकांना हमीभाव नाही. कांदा, तूर बऱ्याच वेळेला मातीमोल भावाने विकावा लागतो. क्वचित प्रसंगी या पिकांचे भाव वाढले तर इथला इंडिया आरडा ओरड करायला लागतो व मीडिया त्यांच्या मागे मागे धावत पळतो... "कांदा महागला म्हणून पेपर वाले, चैनल वाले पंचांग वाले ओकू लागले आग शब्दाच्या फुत्काराने जाळू लागले बाग"शेतात राबणारा शेतकरी नेहमीच आसमानी सुलतानिशी संघर्ष करत आलाय. त्याच्या ठाई संघर्ष हा आयुष्यभर पाचीला पुजलेलाच असतो. त्याच्यावर होणारे अन्याय तो उघड्या डोळ्यांनी सतत बघतच आला आहे. आता फक्त संघर्ष करायचा नाही तर त्या विरोधात लढा उभारायचा विचार आता आधुनिक शेतकरी करायला लागलाय. हा विद्रोहच कवी ललित आधाने यांच्या कवितेतून चित्रित झालेला आहे. आधुनिक भारतातील शेतकरी आता पेटून उठलाय आणि इंडिया आणि भारत यांच्यातला फरक मिटवण्यासाठी क्रांती करू पाहतोय."आता आमच्या मस्तकातपेटलेत लाखो सूर्यमळ्याने फुंकले रणशिंगहजार हत्तीचं बळआलंय बाहुत बैलाच्या शिंगाच्या झाल्यात मशालीधमण्या - धमन्यातूनपसरतोय अग्नीलोळ इंडिया अन भारत यातला फरक मिटवण्यासाठी "इथले राजकारणी, व्यापारी, उद्योगपती हेच खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांची छुपे शत्रू आहेत. इथल्या राजकारण्यांना शेतकऱ्याची आठवण फक्त मतदानाच्या वेळेला होते. व्यापारी तर नेहमीच शेतकऱ्याच्या मुळावर उठलेला असतो. शासन व्यवस्थेला आपल्या काखेत घेऊन येथील उद्योगपतीने इथल्या शेतकऱ्यांच्या जमिनी मातीमोल भावाने खरेदी करून शेतकऱ्याला भूमीहीन करून टाकले आहे. असे अनेक आसमानी आणि सुलतानी शत्रू शेतकऱ्यांच्या जमिनीवर आपले बिराडे आणून बसतान मरित आहे आणि शेतकरी मात्र परागंदा होत चालला आहे."छुप्या शत्रूवर चालवू तलवारीची पातीविवेकाचा प्रहार करुनीउधळून टाकू बिऱ्हाडे" शेतकऱ्यांना लुबाडणारे खऱ्या अर्थाने हेच सगळे चोर आहेत. सगळे मिळून शेतकऱ्याला लुटण्याचे काम अगदी शांततेत चालू आहे. अजूनही पारंपरिक पद्धतीने शेती करणाऱ्या शेतकरी बाप आशेवर जगतोय आणि आपल्या शेतीवरचा प्रेम कमी करत नाही. राजकीय, नेते, व्यापारी, कृषीअधिकारी दुकानदार,तलाठी, ग्रामसेवक इ. यांनी शेतकरी वर्गाला लुटून टाकण्यासाठी आपले बिराड थाटलेले आहेत. याच छुप्या शत्रूंची बिराडे उधळून टाकण्याची भाषा कवी करत आहे."त्यांच्या आयुष्यातकुठलाच आजूबा होत नाहीतू फक्तस्त असतो बसून मनाच्या बंदुकीत बारूद ठासून"स्वातंत्र्यानंतर या देशात अनेक बदल झाले, जवळजवळ सर्वच क्षेत्रांमध्ये विकास होताना दिसतोय. शहरांची झगमगाट वाढली. बहुमजली इमारतींची मनोरे चे मनोरे उभे राहत आहेत. गाव आणि खेडे यातले अंतर कमी होऊन खेडे शहराच्या घशात हळूहळू चाललंय. खेडेही आधुनिक रूप घेऊ पाहते. पण इथला शेतकरी स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्यानंतर जसा होता तसाच आजही आहे. शेतकरी आत्महत्या थांबत नाही. शेतकऱ्याची पिळवणूक थांबत नाही. पारंपरिक शेती करणारे शेतकरी मनात सगळं साठवून असतो. पण तो व्यक्त होत नाही..."हातात मेणबत्ती ऐवजी घेऊन येतीलसेज डीएमआयसी समृद्धी स्मार्ट सिटी अन मारणाअंती बापाच्या समाधीलाही जागा उरणार नाही"विकासाच्या थापा मारीत इथली शासन व्यवस्था, उद्योगपती हळूहळू इथल्या शेतकऱ्यांच्या शेतीच्या उरावर बसायला आलेत. डी. एम. आय. सी., समृद्धी, स्मार्ट सिटीच्या नावाखाली इथल्या हजारो शेतकऱ्यांचे करोडो एकर शेती त्यांच्या डोळ्यात देखत लुटण्यात आली. इथल्या शेतकऱ्यांना तर प्रस्थापित समाज व्यवस्थेने रस्त्यावर आणले. कवी नेमके त्यावर बोट ठेवून निर्देश करताना इथल्या शेतकरी बापाला त्याच्या मरण्याअंती समाधीला सुद्धा जागा उरणार नाही अशी परिस्थिती निर्माण झाल्याचे वर्णन करतो..."जे दिसलं ते घ्या विद्रोहाची अफू प्या स्वाभिमानाचा गांजा ओढा वाटेत येईल त्याला खुशाल झोडा "कवीला याची प्रचंड चिड येते म्हणून तो विद्रोहाची भाषा आता बोलू लागतो.... येथील कृषक व्यवस्थेला व कृषकाला नेस्तनाबूत करणाऱ्या व्यवस्थेतील प्रत्येकाला विद्रोहाची अफू घेऊन वाटेत येईल त्याला आडवं करण्याची भाषा कवी करतो..."मी हे हलाहल का प्यावंआता मी टाकून देईन कुळवअन घेईल हातात लेखणीकाम निष्पळ ठरवल्यावर सपासप वार करायला सपासप वार करायला" शतकानू शतके होत असलेल्या अन्यायाला आता इथला शेतकरी वैतागला आहे हे कवी ललित अधाने यांच्या प्रत्येक कवितेतून जाणवते. हा विद्रोह केवळ एका कवीचा नसून शेतकरी बापाच्या मुलाचा विद्रोह आहे. आणि म्हणून ही संवेदनशीलता, कळकळ त्यांच्या कवितेतून शब्दा शब्दातून व्यक्त होते. आजा, पंजा, खापरपंजा, मी आणि माझी मुले आतापर्यंत सगळे भोगत आलोय. आणखी किती दिवस हे सहन करायचे हातातलं कुळव बाजूला ठेऊन मी माझ्या लेखणीने या संपूर्ण व्यवस्थेवर वार करण्यासाठी तयार झालोय.कवितेतील बोली भाषेतील सौंदर्य व बोलीभाषेतील शेतकऱ्यांच्या शेतीच्या कामाला लागणारी साधनं व्यवस्थेच्या विरुद्ध विद्रोहासाठी प्रतिमा रूपाने शस्त्र रूपान येताना दिसतात. कवितेतील विद्रोह हा अस्त्राचे शब्द बनून रक्तरंजित क्रांतीची भाषा करतो आहे. मोगरा, नांगर, चाबूक, चावऱ्या, आसूड, रूम्हणं, इळत, कुराड, कोयता, हातोडा, घन, खुटा, पाचर, शिवळा, तलवार, शिंग, भाला, लेखणी इ.

याशिवाय ग्रामीण बोलीतील शब्द माहित असलेले अथवा माहीत नसलेले संत आवजारे ललित अधाने यांच्या कवितेत प्रतिके, प्रतिमा माध्यमातून आलेले आहेत. उदा. कुळव,उपनेर, पेरा, वाफेवर, गाभडून, तिफन, मोगडा, राहक्या, गाभण, बरगड्या, कलई, नाडा, दावं , सौंदर, गांडयेठण, तंडरणं, तिव्हा, तीवई, माचा, वासे, सुव्वा, फासे, ऐरण, भाता, भरडा, धांडोर, औत, मचान, मेढा, रास,फाळ, आखर, दावणी, पसा, डेग, पोटार्यात, ठुसा, आधन, चाडं, कुबुंडी, आख, वंगण, तुंब, चकऱ्या, तारचूक, आखरी पेटी, पांजरी, साटा, छकडा, खुटल्या, धुऱ्या, जोतं, आरे, पाठे, ढूसण्या, खंडीखंडी, पांभर, फसाठी, बांडगुळ, मातेरं, भाकड इ. बोली भाषेचे सौंदर्य अधाने यांच्या कवितासंग्रहातून आवतरलेले आहे."मी मात्र आतासहा महिने शेतीअन सहा महिने युद्ध करायचे म्हणतोयलेखणीचं हत्यार घेऊन..."कवी ललित अधाने हे ग्रामीण भागातून आलेले असल्यामुळे शेती, शेतकरी आणि त्यांच्या मागील चार-पाच दशकातील विवीध प्रश्नांची, समस्यांची त्यांना जाणीव आहे. ‘माही गोधडी छप्पन भोकी’ या कवितासंग्रहातून केवळ त्या समस्यांचे रडगाणे येत नाही तर आता सगळे सहन करण्याच्या पलीकडे गेलेले आहे म्हणून विद्रोहाचा 'बिगूल' शब्द माद्यमातून वाजवण्याचा प्रयत्न केलेला आहे. राजकीय, समाजिक, ओद्योगिक इ. व्यवस्थेवर शेतकऱ्यांचा विश्वास उरलेला नाही. कवी अधाने आता मात्र शेती करण्याबरोबरच या संपूर्ण व्यवस्थेविरुद्ध युद्ध करण्याची भाषा करतोय. एकूणच अलीकडील काळातील ग्रामीण कवितेतील प्रखर विद्रोह व्यक्त करणारा हा कवितासंग्रह आहे असे म्हणता येते.--------

**||'माही गोधडी छप्पन भोकी'||**

कवी ललित अधाने

पृष्ठ – 156 अक्षर वाङ्मय प्रकाशन, पुणे

किंमत-300 रुपये

**डॉ. ज्ञानेश्वर बाबुराव खिल्लारी**

देवगिरी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगरमो.९४०४०२०३६३